**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,**
**कक्ष क्रमांक ४१८, चौथा मजला, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.**
Email ID: -mashi4-hted@mah.gov.in

---

**क्रमांक :- HTED-२९०१०/२७/८४०७८३/२०२४/MHT(HE-४)** **दिनांक:- १९ सप्टेंबर, २०२५.**

प्रति,
कुलगुरू,
सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठे.
(कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक विद्यापीठ वगळून)

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणांतर्गत नवीन तुकडी/विद्याशाखा/अभ्यासक्रम यांचे प्रस्ताव New College Permission System (NCPS) या ऑनलाईन प्रणालीमार्फत शासनास सादर करणेबाबत.

संदर्भ:- शासन पत्र क्र. संकीर्ण—२०२५/ई —१३१७१५३/विशि-५ दिनांक - १९.०९.२०२५.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन पत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ७६ मधील तरतूदीस अनुसरून महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यापीठनिहाय नवीन महाविद्यालयासाठीचे मंजूर स्थळबिंदू आपणांस कळविण्यात आले आहेत. सदर मंजूर स्थळ

बिंदूना आवश्यकतेनुसार विद्यापीठ प्राधिकरणाची मान्यता घेण्यांत यावी आणि त्यानुसार प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशा सूचना सर्व अकृषी विद्यापीठांना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

२. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून नवीन महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठयक्रम/ विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी शासनाने "नवीन महाविद्यालय मान्यता प्रणाली" [(New College Permission System (NCPS)] ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून, या प्रणालीव्दारे संस्थेने विद्यापीठाकडे प्रस्ताव

सादर करणेबाबत तसेच विद्यापीठाकडून ऑफलाईन प्रस्ताव स्विकारण्यात येणार नसल्याच्या सूचना विद्यापीठाच्या जाहिरातीमध्ये नमूद करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

३. त्यानुसार, शासनास नवीन महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठयक्रम/ विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी NCPS या ऑनलाईन प्रणालीची खालील लिंक आपणांस उपलब्ध करून देण्यात येत आहे.

https://htedu.maharashtra.gov.in/NCPS/

४. संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिध्द करण्यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करीता माहेडने दिलेल्या मान्यतेनुसार नवीन महाविद्यालयासंबंधीचे स्थळबिंदू तसेच विस्तारीकरणाबाबतची माहिती सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये भरण्याची कार्यवाही करावी. तद्नंतरच सदर प्रणालीची लिंक अर्ज करण्याकरीता संस्थांना उपलब्ध करून देण्यात यावी.

५. त्याचप्रमाणे, येथे आपणास कळविण्यात येते की, बार काउन्सिल ऑफ इंडियाने त्यांच्या दिनांक १३.०८.२०२५ रोजीच्या प्रेस रिलिजनुसार, पुढील ३ वर्षे नवीन विधी महाविद्यालयांना परवानगी देण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आलेला आहे. सबब, विस्तारीकरणांतर्गत “विधी” संदर्भातील नवीन अभ्यासक्रम/विद्याशाखा/विषय/नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत (NOC) प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संस्थांचे/महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, २०१६ च्या कलम १०९ (४) (ग) नुसार स्विकारण्यात यावेत. विद्यापीठाने सदर बाब जाहिरातीत नमूद करावी.

(जयश्री पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन